**निशाणी क्र. १ वरील आदेश**
(पारित दिनांक ०९.१२.२०२१)

प्रस्तुत अर्ज कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जास कुणाचे आक्षेप आहे किंवा काय हे तपासुन पाहण्याकरीता दिनांक १३.०९.२०२१ रोजी, दैनिक वृत्तपत्र 'विदर्भ की दहाड' मध्ये जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदर वृत्तपत्र दस्तऐवज यादी (**नि.क्र.८**) सोबत जोडले आहे व नियमानुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेले असून त्याचा अहवाल (**नि.क्र.६**) प्रमाणे जोडलेला आहे. जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून विहित मुदतीत अर्जास कोणीही आक्षेप घेतला नाही.

३. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र. ५ किसन बाटु कास्देकर यांना (**नि.क्र.९**) वर तपासले आहे. मयत मालोबाई बाटु कास्देकर यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत व अर्जदारांच्या च्या आधार कार्डची पडताळणी केलेल्या प्रती व काही छायांकित प्रती दस्तऐवज यादी (**नि.क्र.४**) सोबत दाखल केलेली आहे. अर्जदार क्र. ५ च्या साक्षीपुराव्यावरून अर्जदार हे मयत मालोबाई बाटु कास्देकर यांचे कायदेशिर वारसदार आहेत. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे मुले व मुली आहेत. मयत मालोबाई बाटु कास्देकर ही दिनांक १५.१२.२०१३ रोजी मौजा सुसर्दा, ता. धारणी, जि. अमरावती येथे मयत

झाली. अर्जात नमूद व्यक्तींच्या व्यतिरिक्त मयत मालोबाई बाटु कास्देकर यांना कोणीही वारस नाही. अर्जदारांनी वारस म्हणून, खाजगी व शासकीय योजनेचा लाभ मिळावा म्हणून, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्ज दाखल केला आहे.

४. न्यायालयासमक्ष दाखल केलेल्या तोंडी व लेखी साक्षीपुराव्यावरून, अर्जदार हे मयत मालोबाई बाटु कास्देकर यांचे वारस असल्याचे दिसून येते. करिता पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे मयत मालोबाई बाटु कास्देकर यांचे वारस असल्याबाबत, अपेडिक्स–बी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये औपचारीक दाखला देण्यात यावा.

दिनांकः ०९.१२.२०२१

**(एस. जी. गोरे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धारणी.**

**Certificate**

I affirmed that, the contents of this PDF file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. A. S. Pathak, |
| Court Name | : | Shri. S. G. Gore,<br>J.M.F.C., Dharni. |
| Order signed by P.O. | : | 09.12.2021. |
| Order uploaded on | : | 09.12.2021. |